

कोल्हापूर : अखिल भारतीय केनोईंग व कयाकिंग स्पर्धेत सुवर्ण व रौप्य पदक पटकाविणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या संघास बक्षीस देताना मोहनलाल विद्यापीठाचे डॉ. एन. एस. राठोड, प्रा. आय. व्ही. त्रिवेदी, प्रा. आनंद पालिका वाला, डॉ. हेमराजसिंग चौधरी.

# केनोईंग, कयाकिंगमध्ये विद्यापीठ संघाला रौप्यपदक

**कोल्हापूर :** अखिल भारतीय विद्यापीठ व मोहनलाल सुंखोडिया विद्यापीठातर्फे संयुक्त विद्यमाने फतेहपूर लेक येथे झालेल्या अखिल भारतीय केनोईंग व कयाकिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने के ४- २०० मीटर प्रकारात रौप्य पदक पटकावले. के१-२०० वैयक्तिक प्रकारात गिरीश नेर्लेकरने सुवर्णपदक मिळवले. संघ असा : गिरीश नेर्लेकर, ओमकार पाटील, ओमकार जाधव, सोहम मगदूम. त्यांना प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील यांचे मार्गदर्शन, तर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन मिळाले. मोहनलाल विद्यापीठाचे डॉ. एन. एस. राठोड, प्रा. आय. व्ही. त्रिवेदी, प्रा. आनंद पालिका वाला, डॉ. हेमराजसिंग चौधरी यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण झाले.